दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २०१ । सोमवार ४ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# अक्षय कर्डिलेंचा दणदणीत विजय

## राहुरीत भाजपने जागा राखली । विरोधी सहाही उमेदवारांची अनामत जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** नगर-राहुरी विधानसभा मतदारसंघासाठी झालेल्या पोटनिवडणुकीत अपेक्षेप्रमाणे भाजपचे उमेदवार अक्षय शिवाजी कर्डिले १ लाख १२ हजार ५८७ मतांनी विजयी झाले आहेत. पहिल्या फेरीपासून कर्डिले यांनी आघाडी घेतली ती शेवटच्या फेरीपर्यंत कायम राहिली. प्रमुख विरोधी गोविंद मोकाटे (राष्ट्रवादी शप) यांना २७ हजार ५०६ मते मिळाली. कर्डिले यांच्या विक्रमी विजयाबरोबरच येथे विरोधी सर्व ६ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार संग्राम जगताप, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग व अनिल मोहिते यांच्या उपस्थितीत विजयी उमेदवार अक्षय कर्डिले यांनी निवडणूक निर्णय अधिकारी अनुपकुमार यादव यांच्याकडून प्रमाणपत्र स्वीकारले. मंत्री विखे यांनी अक्षय कर्डिले यांचा सत्कार केला.

### उमेदवारांना मिळालेली मते

अक्षय शिवाजीराव कर्डिले (भाजप) – १ लाख ४० हजार ९३ मते
गोविंद खंडू मोकाटे (शरद पवार गट) – २७ हजार ५०६ मते
संतोष एकनाथ चोळके (वंचित बहुजन आघाडी) – ५ हजार ६९०
ॲड. अथर्व साहेबराव म्हसे (अपक्ष) – ११४८
रावसाहेब सदाराम खेवरे (अपक्ष) – ७ हजार २९९
सूर्यभान उर्फ सुरेश दत्तात्रय लांबे (अपक्ष) –१३६८
महेश केशव हापसे (अपक्ष) – २०५१
नोटा – १६३२
टपाली मतदान – ४११ (त्यातील २९ मते बाद झाली)

### शिवाजीराव कर्डिले यांचा वारसा पुढे चालविण्याची मोठी जबाबदारी

दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी राहुरी मतदारसंघात विकासकामांची मोठी परंपरा निर्माण केली होती. जनतेशी जोडलेला नेता म्हणून त्यांची प्रतिमा होती व यामुळेच ते सर्वसामान्यांचे नेते बनले होते. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याची मोठी जबाबदारी अक्षय कर्डिले यांच्यावर आहे. दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे पाहिलेले स्वप्न आता अक्षय कर्डिलेस पूर्ण करतील असा जनतेचा ठाम विश्वास आहे.

# ममता बॅनर्जी, स्टॅलिन यांचे गड उद्‌ध्वस्त



**मुंबई । वृत्तसंस्था –** देशातील पाच राज्यांच्या निकालाचे अंतिम कल हाती आले असून पश्चिम बंगालमध्ये तृणमूलच्या ममता बॅनर्जी आणि तामिळनाडूत एम. के. स्टॅलिन यांचे गड उद्‌ध्वस्त झाले आहेत. पश्चिम बंगालमध्ये भाजपने दोन तृतियांश जागा जिंकून बंगाल काबीज करण्याचे गेल्या अनेक वर्षांचे स्वप्न पूर्ण केले आहे. भाजपला या ठिकाणी पहिल्यांदाच सत्ता मिळाली आहे. तर तामिळनाडूमध्ये सुपरस्टार थलापती विजयने करिश्मा दाखवत एम. के. स्टॅलिन यांना धोबीपछाड दिली आहे. स्वतः स्टॅलिन यांना पराभवाचा धक्का बसला आहे.
पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम व पद्दुचेरी अशा पाच राज्यांच्या निवडणुकांची मतमोजणी आज पार पाडली. पश्चिम बंगालमध्ये गेल्या पंधरा वर्षांपासूनची ममता बॅनर्जी यांच्या सत्तेला सुरूंग लावत भाजपने येथे महापरिवर्तन घडवले आहे.
दुसरीकडे तामिळनाडूमध्ये दुपारपर्यंत आलेल्या आकडेवारीनुसार टीव्हीके पक्ष १०७ जागांवर आघाडीवर आहे. तर, द्रमुक ७२ आणि अण्णाद्रमुक ५५ जागांवर आघाडीवर आहे. गेल्या १० वर्षांपासून सत्तेत असलेल्या द्रमुकला मोठा धक्का बसला आहे. अभिनेता विजय थलपती याच्या टीव्हीकेनं १०७ जागांवर आघाडी घेतली आहे. तामिळनाडूच्या राजकारणात अभिनेत्यांनी यशस्वी होण्याचा ट्रेंड पुन्हा एकदा पाहायला मिळाला आहे. द्रमुक नेते मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांच्यापुढं अभिनेता विजयचा टिकाव लागणार का याकडे लक्ष लागलं होतं. मात्र, अभिनेता विजयच्या पक्षानं शंभरपेक्षा अधिक जागांवर आघाडी मिळवत सत्ता स्थापनेच्या दिशेनं वाटचाल सुरु केली आहे.

### पाच राज्यांची दुपारपर्यंत हाती आलेली आकडेवारी

**पश्चिम बंगाल** – भाजप– १९५, तृणमूल काँग्रेस ९२, काँग्रेस ०, डावे पक्ष २, इतर २, एकूण जागा – २९३
**तामिळनाडू** – द्रमुक ६८, अण्णा द्रमुक ५८, टीव्हीके १०६, इतर ०, एकूण जागा – २३४.
**केरळ** - काँग्रेस १०४, डावी आघाडी ३४,इतर २, एकूण जागा –१४०.
**आसाम** - भाजप १००, काँग्रेस २०, इतर ६, एकूण जागा –१२६.
पुद्दुचेरी – भाजप २२, काँग्रेस ६, इतर १.

### बंगालमध्ये भाजप नाही भारत जिंकला – फडणवीस

भाजपच्या दणदणीत यशावर प्रतिक्रिया व्यक्त करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी जेव्हा बंगालमध्ये गेलो होतो, त्यावेळी एका पत्रकाराने मला विचारलं की, निवडणुकांवेळी ममता बॅनर्जी म्हणतात भाजपचे लोक हे पश्चिम बंगालच्या बाहेरचे आहेत. मात्र, मी पत्रकारांना सांगितले की, भाजपची स्थापना ज्यांनी केली ते श्यामाप्रसाद मुखर्जी हेच पश्चिम बंगालचे होते, त्यामुळे खऱ्या बंगालचा पक्ष कोणता असेल तर तो भारतीय जनता पक्ष आहे. आज बंगालाच्या जनतेनं दीदींना दाखवून दिलं, बंगालचा खरा पक्ष कोणता आहे. बंगालच्या लोकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर विश्वास ठेऊन बंगालमध्ये पोरीबर्तन नाही, महापोरीबर्तन करुन दाखवलं. बंगाल, आसाम, पद्दुचेरीतील हा विजय भारतीयांचा मोदींवर असलेल्या विश्वासाचा हा विजय आहे. बंगालमध्ये ३० वर्षे काँग्रेस, ३६ वर्षे कम्युनिस्ट आणि या दोघांपेक्षाही खतरनाक १५ वर्षे ममता दीदीचं कुशासन होतं. आता परिवर्तन झाल्याचं फडणवीसांनी म्हटले.

### ममता बॅनर्जींना जनतेची चपराक – विखे पाटील

पश्चिम बंगालमध्ये आता जंगल राज संपले आहे. पश्चिम बंगालमध्ये कायद्याचे राज्य शिल्लक राहिले नव्हते अशीच भूमिका पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनीही मांडली होती. पश्चिम बंगाल म्हणजे घुसखोरांचा प्रांत झाला होता, या घुसखोरीमुळे देशाला अंतर्गत धोका निर्माण झाला होता. ठराविक समाजाच्या मतांसाठी लाचार झालेल्या ममता बॅनर्जी यांना पश्चिम बंगालच्या जनतेने चांगलीच चपराक दिली आहे, अशी प्रतिक्रिया जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बंगालच्या विजयानंतर व्यक्त केली.

# सुनेत्रा पवार यांचा पॉवर गेम

## बारामतीतील रेकॉर्डब्रेक विजयाने देशाच्या इतिहासात नव्या विक्रमाची नोंद

**पुणे । वृत्तसंस्था –** राज्याचे लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात सुनेत्रा अजित पवार यांनी २ लाख १८ हजार ९३० इतक्या प्रचंड बहुमताने विजय मिळवला असून, त्यांचा हा विजय देशाच्या राजकारणाच्या इतिहासात नवा विक्रम ठरला आहे. बारामतीतून अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवारांसह एकूण २३ उमेदवार रिंगणात होते. सुनेत्रा पवार यांनी २ लाख १८ हजार ९३० इतक्या प्रचंड मताधिक्याने विजय मिळवत देशातील आतापर्यंतचा सर्वात मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे.



### सुनीलकुमार शर्मा यांचा विक्रम मोडीत

याआधी देशात सर्वाधिक मताधिक्याने निवडून येण्याचा मान उत्तर प्रदेशातील साहिबाबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुनील कुमार शर्मा यांच्याकडे होता. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी २ लाख १४ हजार ८३५ मतांच्या फरकाने विजय मिळवला होता. सुनेत्रा पवार यांनी आता हा आकडा पार करत नवा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला आहे.

**सुनेत्रा पवार भावूक...** विजयानंतर बोलताना सुनेत्रा पवार म्हणाल्या, दादांनंतरची ही पहिलीच निवडणूक आहे. मला कधीही वाटलं नव्हतं की मला अशा निवडणुकीला सामोरं जावं लागेल, मन खरं तर खूप भरून येत आहे. पण आज बारामतीकरांनी जो दादांवरती विश्वास दाखवला आहे, प्रत्येक बारामतीकरांनी दादांनी केलेल्या विकासकामावरचं प्रतिक म्हणून आज त्यांना भावांजली वाहिलेली आहे असं मी म्हणेन, बारामतीकरांनी दिलेलं मतदान हे दादांवरील विश्वास त्यांनी आजवर केलेली कामे, सेवा आणि जनतेवरचं प्रेम हे जनतेने त्यांच्या मतातून मला दिलं असं मी मानते आहे. बारामतीकरांनी जे मतदान केलं आहे, त्यावरून अजित दादांवरचा अढळ विश्वास त्यांनी देखील माझ्या पाठीमागे अढळपणे उभा केला आहे, असं चित्र आहे. दादांना आदरांजली वाहतानाच माझ्यावरचा विश्वास त्यांनी दाखवला आहे, त्यासाठी मी त्यांचे आभार मानते, माझ्यावरची जबाबदारी वाढली आहे, बारामतीकरांना दादांनी जी विकास कामांची स्वप्ने दाखवली ती पूर्ण करण्याचा विश्वास बारामतीकरांना वाटतोय ते त्यांनी मताद्वारे दाखवले आहे. ती कामे पूर्ण करण्यासाठी मी प्रयत्न करेन, असंही पुढे सुनेत्रा पवारांनी म्हटले आहे.

## पारनेरमध्ये धक्कादायक घटना

# महिला डॉक्टरची आत्महत्या

## सासरच्यांवर गुन्हा दाखल, मात्र आरोपींना अद्याप अटक नाही

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पारनेर–** लग्नानंतर माहेरहून १२ लाख रुपयांची मागणी, शिवीगाळ, दमदाटी आणि सततच्या मानसिक छळाला कंटाळून २६ वर्षीय महिला डॉक्टरने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना पारनेर तालुक्यातील गोरेगाव येथे घडली आहे. डॉ. गौरी सुनिल चौरे (वय २६, रा. काळपट्टी वस्ती, गोरेगाव, ता. पारनेर) असे या दुर्दैवी तरुणीचे नाव आहे. याप्रकरणी तिच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून पती, सासू आणि सासऱ्यांविरुद्ध आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, गुन्हा दाखल होऊनही आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

तक्रारदार सुनिल जबाजी चौरे (वय ५४, रा. गोरेगाव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, गौरीचे लग्न २३ नोव्हेंबर २०२४ रोजी अमित बाबासाहेब दळवी (रा. तपोवन रोड, अहिल्यानगर; सध्या कामोठा, मुंबई) यांच्याशी मोठ्या थाटामाटात झाले होते. लग्नानंतर सुरुवातीचे तीन महिने अहिल्यानगर येथे सर्व काही सुरळीत होते. त्यानंतर हे जोडपे मुंबईतील कामोठा येथे वास्तव्यास गेले. मुंबईला गेल्यानंतर पती अमित दळवी याने, फ्लॅट घेण्यासाठी माहेरहून १२ लाख रुपये आन अशी मागणी करत गौरीला त्रास देण्यास सुरुवात केली. सासू आणि सासऱ्यांनीही तुम्ही लग्न साधे केले, भाड्याच्या घरात राहण्यापेक्षा पैसे आणा असे म्हणत तिला वारंवार टोमणे मारले.

गौरीने खाजगी रुग्णालयात नोकरी सुरू केली होती, परंतु तिचा पगारही सासरच्यांनी काढून घेतला. तसेच, फेब्रुवारी २०२५ मध्ये तिच्या लग्नातील सोन्याचे दागिनेही बळकावून घेतल्याचे तिने आपल्या आई-वडिलांना फोनवरून सांगितले होते. पती अमित हा दारूच्या आहारी जाऊन पैसे मागण्यासाठी तिला मारहाण करत असे. गौरीने वेळोवेळी आपल्या आई-वडिलांना आणि काकांना याबाबत माहिती दिली होती.

ऑक्टोबर २०२५ मध्ये गौरीच्या चुलत बहिणीचे लग्नात आलेले सासरचे लोक म्हणाले, ''तुम्ही हे लग्न कसे मोठे केले? आमच्या वेळी भिक लागली होती का?'' यावर गौरीने आक्षेप घेतला असता, सर्वांसमोर तिचा अपमान करण्यात आला. फेब्रुवारी २०२६ मध्ये गौरीने आपल्या नवऱ्याचे इतर मुलींशी असलेले अनैतिक संबंध असल्याचे घरच्यांना सांगितले. याबाबत तिची आई मुंबईला जाऊन वाद मिटवून आली, तरीही छळ थांबला नाही.

सविस्तर घटनेनुसार, २७ एप्रिल २०२६ रोजी गौरी, तिचा पती अमित आणि सासरे बाबासाहेब हे गोरेगाव येथे आले. त्यावेळी अमितने, ''तू इथेच थांब, मी पप्पांना नगरला सोडून तुला घ्यायला येतो,'' असे सांगून ■ पान ४ वर

### गुन्हा दाखल, पण आरोपींना अटक नाही

मृत गौरीच्या वडिलांनी पारनेर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, पती अमित बाबासाहेब दळवी, सासू संगीता बाबासाहेब दळवी व सासरे बाबासाहेब हरीभाऊ दळवी यांच्यावर आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, पोलिसांकडून अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

# बुद्धिबळ खेळाडूंमध्ये दूरदृष्टी, संयम आणि सहनशीलता- उपमहापौर धनंजय जाधव

## उपमहापौर धनंजय जाधव चषक जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धेचा उत्साहात शुभारंभ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेचे नवनिर्वाचित उपमहापौर धनंजय जाधव यांच्या नावाने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धे चा शुभारंभ उत्साहात पार पडला. अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित ही स्पर्धा ७, ९, १३ व १९ वर्षांखालील खेळाडूंसाठी घेण्यात आली आहे.
गायत्री मंगल कार्यालय, महाजन गल्ली येथे पार पडलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन उपमहापौर धनंजय जाधव व संघटनेचे सचिव यशवंत बापट यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन करण्यात आले. या वेळी खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त श्याम कांबळे, पारुनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी, पंच देवेंद्र ढोकळे, प्रशांत घंगेकर, चेतन कड, मनिष जसवानी तसेच खेळाडू व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेचे प्रास्ताविक करताना सचिव यशवंत बापट यांनी सांगितले की, जिल्ह्यातील अनेक दिग्गज खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले असून स्पर्धा दर्जेदार व रोमहर्षक ठरणार आहे. तसेच संघटनेला दरवेळी हॉल भाड्याने घ्यावा लागतो, त्यामुळे महानगरपालिकेमार्फत कायमस्वरूपी हॉल उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी यावेळी मांडली.

उपमहापौर धनंजय जाधव आपल्या भाषणात म्हणाले की, बुद्धिबळासारख्या बौद्धिक खेळाचे उद्घाटन करण्याची संधी मिळणे हे भाग्याची बाब आहे. ''बुद्धिबळ खेळाडूंमध्ये दूरदृष्टी, संयम आणि सहनशीलता असते. अशा खेळामुळे व्यक्तिमत्त्व घडते,'' असे त्यांनी सांगितले. तसेच संघटनेची हॉलसंदर्भातील मागणी सकारात्मकरीत्या विचारात घेऊन महानगरपालिकेमार्फत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

शहराच्या विकासासोबत पर्यावरण संवर्धनालाही प्राधान्य देत एक लाख झाडे लावण्याचा मानस व्यक्त करत, स्पर्धेतील विजेत्या ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### नगरमध्ये ५ ते १५ मे या कालावधीत योग शिबिराचे आयोजन

अहिल्यानगर- भारतीय परंपरेतील योग प्राणायाम आता जगभरात प्रचलित झाला आहे. मन आणि शरीर तंदुरुस्त राहण्यासाठी नियमित योगाभ्यास अतिशय महत्त्वाचा मानला जातो. याच अनुषंगाने करा योग राहा निरोगी या संकल्पनेवर जैन फेडरेशन संचलित आनंदऋषीजी योगा सेंटर तर्फे दि. ५ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी ५.४५ ते ७ यावेळेत आनंदऋषीजी ब्लड बँक तळघरात हे शिबीर होईल. प्रसिद्ध योग प्रशिक्षक अनिल मेहेर यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर संपन्न होणार आहे. या शिबिरात योगासन, प्राणायाम, ध्यानधारणा व झुंबा डान्स असे सर्वसमावेशक प्रशिक्षण एकाच ठिकाणी दिले जाणार आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात वाढती ॲसिडिटी, गॅस, बी.पी., शुगर, निद्रानाश, तणाव या समस्या सर्वसामान्य झाल्या आहेत. या सर्व व्याधींवर योग हे रामबाण औषध असल्याने नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा. सर्व वयोगटातील महिला-पुरुष शिबिरात सहभागी होऊ शकतील. जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून आपले आयुष्य निरोगी व आनंदी करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क - अनिल मेहेर (मो.९०२८१७७७३२), सिकची सर (मो.९४२२०८३८६०), पडोळे सर (मो.९४२२२२०९१०).

### खेळाडूंसाठी २० दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन




अहिल्यानगर- अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने जिल्ह्यातील खेळाडूंसाठी २० दिवसांचे प्राथमिक व अद्ययावत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. खो-खो, बॅडमिंटन, कुस्ती व कबड्डी खेळासाठी दोन टप्प्यात सदर प्रशिक्षण शिबिर होणार असून, पहिला टप्पा ४ ते १३ मे आणि दुसरा टप्पा १८ मे ते २७ मे दरम्यान होणार आहे. यामध्ये अधिकाधिक खेळाडूंनी या शिबिरामध्ये सहभाग नोंदविण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे. जिल्ह्यात खेळाचा प्रचार, प्रसार होऊन खेळाडूंची संख्या वाढविण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी, तसेच शहरी व गावपातळीवर चांगले खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी ८ ते १४ वयोगटातील व वरिष्ठ गटात सकाळी ६ ते ८.३० व सायंकाळी ५ ते ७.३० या वेळेत शिबिराचे आयोजन केले आहे. खो-खो खेळाचे शिबिर बाणेश्वर क्रीडा मंडळ, बुऱ्हाणनगर व आबासाहेब काकडे विद्यालय, निर्मलनगर, शेवगाव येथे होणार आहे. बॅडमिंटन व कबड्डी खेळासाठी जिल्हा क्रीडा संकुल, अहिल्यानगर येथे शिबिर होईल. संभाजी राजे कुस्ती केंद्र सावेडी, तालुका क्रीडा संकुल बुऱ्हाणनगर येथे कुस्तीचे शिबिर होणार आहे. जिल्हा क्रीडा प्रशिक्षण योजनेंतर्गत प्राथमिक व अद्ययावत प्रशिक्षण शिबिरात खो-खो, बॅडमिंटन, कुस्ती व कबड्डी या खेळांच्या अधिकाधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवावा. प्रशिक्षण शिबिराच्या अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

# महाराष्ट्र दिन हुतात्म्यांचे बलिदान आणि विजयाचा सोहळा– सिताराम खिलारी पा.

**श्री ढोकेश्वर विद्यालयात, महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, १ मे, २०२६ रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिन संस्थेचे जेष्ठ विश्वस्त मा. सितारामजी खिलारी उर्फ अण्णा यांच्या हस्ते ध्वजारोहण करून अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अण्णांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. हा दिवस महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा, मराठी अस्मिता, हुतात्म्यांचे बलिदान आणि विजयाचा सोहळा आहे. या प्रसंगी अण्णांनी जागतिक कामगार दिन, मराठी राजभाषा दिनाविषयी माहिती दिली व शुभेच्छा दिल्या. तसेच उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे, विद्यार्थ्यांनी काळजी घेण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात संस्थेच्या ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षेत जिल्ह्यात नववा क्रमांक मिळवणारी विद्यार्थिनी कु. वैभवी कटारिया व तेरावा क्रमांक मिळवणारी कु. आराध्या कडुसकर व मार्गदर्शक शिक्षकांचा अण्णांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

विद्यालयाचे प्राचार्य श्री. बाळासाहेब खिलारी यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी १०६ हुतात्म्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. महाराष्ट्र घडविणे ही आपली जबाबदारी आहे. आज जागतिक कामगार दिन असून हा दिवस शेतकरी, मजूर, कष्टकरी, कामगार यांनी आपल्या हक्कासाठी केलेल्या संघर्षाची जाणीव करून देतो. यावेळी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये उन्हात बाहेर न पडता, आपण घरात बसून वेगवेगळे छंद जोपासण्याचे आवाहन केले व सर्वांना महाराष्ट्र दिन जागतिक कामगार दिन व मराठी राजभाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. लहू जाधव व उपाध्यक्ष श्री. अविनाश भालके ही उपस्थित होते. श्री. भालके यांनीही आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. बाबासाहेब जाधव यांनी केले. अध्यक्ष निवड श्री. निलेश जासूद यांनी तर, सूत्रसंचालन श्री. अतुल सैद यांनी केले व आभार पर्यवेक्षिका श्रीम. मनिषा गाडगे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कला विभागाचे समन्वयक श्री. विजय सोबले, शास्त्र विभागाचे समन्वयक श्री. अशोक गांगड, ज्येष्ठ शिक्षक श्री. मल्हारी वागस्कर, श्री. रविंद्र मते, श्री. नारायण शेळके, श्री. राजेंद्र ढोणे, प्रिया डव्हणे यांचे सह पालक शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोणत्याही समस्येवरील उत्तर म्हणजे उल्हास दुगड - अशोक मुथा

**भाऊसाहेब फिरोदियाचे मुख्याध्यापक उल्हास दुगड यांच्या सेवापूर्तीनिमित्त गौरव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे सखोल अभ्यासू, खेळाडू व्यक्तिमत्वाने आपल्या तत्त्वांशी तडजोड न करता आजपर्यंत नियोजनबद्धतेमुळे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या गुणवत्तेतील प्रगतीचा आलेख उंचावत नेलेला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाची विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व संस्थेस आजही खरोखरच गरज असल्याचे प्रतिपादन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष अशोक मुथा यांनी केले.

भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक उल्हास दुगड यांच्या सेवापूर्ती सोहळ्यात अध्यक्षीय भाषणात मुथा बोलत होते. या सेवापूर्ती सोहळ्यास संस्थेचे खजिनदार प्रकाश गांधी, विश्वस्त मंडळाचे सदस्य गौरव मिरीकर, सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी, तसेच अशोकभाऊ फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, माजी मुख्याध्यापक अजय कुमार बारगळ, बाबुराव ठोकळ, विजयकुमार जगदाळे, कुसुम मावची, उपमुख्याध्यापक दत्तात्रय पानमळकर, रावसाहेब बाबर, सुषमा चिटमील, पोपटराव पवार, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, बाणेश्वर विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक बाळासाहेब वाकचौरे, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे उपमुख्याध्यापक कैलास साबळे, पर्यवेक्षक वैभव कुलकर्णी, कल्पना पाठक तसेच शिक्षक वृंद, कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना मुथा यांनी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या विकासामध्ये त्यांचा खारीचा वाटा आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नसल्याचे सांगून, त्यांच्या कार्याचा आढावा घेतला.

संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी उल्हास दुगड सरांच्या नियोजनबद्ध कामाचे, प्रामाणिकपणाचे, तत्वांशी तडजोड न करता प्रगतीचा आलेख उंचावत नेणाऱ्या कामाचे कौतुक करून त्यांना त्यांच्या पुढील निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या व संस्थेस उल्हास दुगड सारख्या मुख्याध्यापकांची गरज असल्याचे सांगून, निवृत्तीनंतर त्यांची उणीव भासणार असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी, गौरव मिरीकर, मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, माजी मुख्याध्यापक अजय कुमार बारगळ, माजी उपमुख्याध्यापक रावसाहेब बाबर , उज्वला कळमकर, विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब वाव्हळ, वैभव कुलकर्णी तसेच विद्यालयाच्या ज्येष्ठ अध्यापिका सुलभा कुलकर्णी, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील पंडित यांनी आपल्या मनोगतातून सरांच्या विकास कामाच्या आठवणींना उजाळा दिला. एक आदरयुक्त भीती असणारे, वार्षिक कामाचे उत्तम नियोजन, समान कामाची विभागणी, योग्य पद्धतीने काम करून घेण्याचा हातखंडा असलेले, विद्यार्थी प्रिय, शिक्षक प्रिय, मुख्याध्यापक तसेच राज्य राष्ट्रीय क्रीडा प्रकारात २९ सुवर्ण, ६ रोप्य, ३ कांस्यपदकांची कमाई , नवव्या आशियाई क्रीडा स्पर्धा मलेशिया येथे भारताचे प्रतिनिधित्व करणारे तसेच भालाफेक, थाळीफेक, गोळा फेक, तिरंदाजी यामध्ये निष्णात असणारे अहमदनगर एज्युकेशन सोसायटीत १९८९ रोजी भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून रुजू होऊन भिंगार हायस्कूलमध्ये उपमुख्याध्यापक तर महेश मुनोत विद्यालय वांबोरी या ठिकाणी मुख्याध्यापक पदाची सूत्रे हातात घेऊन पुन्हा भाऊसाहेब फिरोदिया या ठिकाणी मुख्याध्यापक म्हणून पदभार स्वीकारून एकूण ३७ वर्ष कामकाज पाहिले. असे प्रास्ताविकेतून गंधाली पटवर्धन यांनी सरांच्या कामाचा आढावा घेतला. सत्कारास उत्तर देताना भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक उल्हास दुगड यांनी आपल्या मनोगतातून अशोकभाऊ फिरोदिया यांनी दिलेल्या संधीमुळे व छायाताई फिरोदिया यांनी त्यांच्यावर दाखवलेल्या विश्वासामुळेच त्यांनी आपल्या कार्याचा झेंडा कायमच उंचावत ठेवला. पत्नी, मुले, भाऊ–बहीण, शिक्षक वृंद विद्यार्थी यांच्या सहकार्यामुळे आजपर्यंत ते मुख्याध्यापक पदाची सूत्रे व्यवस्थित सांभाळू शकले.

# शेवगाव येथे बॉम्बे मशिनरीच्या गोडाऊनला भीषण आग...

**२२ ते २३ लाख रुपयांच्या नुकसानीचा अंदाज**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** शेवगावमध्ये नेवासा रोड वरील बॉम्बे मशिनरी या दुकानाच्या गोडाऊनला सकाळी सहा वाजेच्या दरम्यान भीषण आग लागली. या आगीमध्ये गोडाऊन मधील २२ ते २३ लाख रुपयांचे सामान जळून खाक झाले असल्याची माहिती बॉम्बे उद्योग समूहाचे नीतू शेठ सबलोक यांनी माहिती दिली,सकाळी झाडून गोळा केलेला कचरा पेटून दिल्यानंतर गोडाऊनला आग लागल्याची माहिती सबलोक यांनी दिली. सकाळी सहा वाजता लागलेली आग ८:३० वाजेपर्यंत चालू होती. यामध्ये आकाशामध्ये मोठे धुराचे लोट पहावयास मिळाले.. त्यानंतर वेगवेगळ्या ठिकाणाहून अग्निशामक दाखल झाल्या.. परंतु त्या अगोदरच गोडाऊन पूर्णपणे जळून खाक झाले होते. परत एकदा शेवगाव नगर परिषदेकडे अग्निशामक गाडी नसल्याकारणाने शेवगाव मध्ये विविध ठिकाणाहून अग्निशामक यायला उशीर होतो व त्यामुळे आगीमध्ये मोठे नुकसान होते. त्यामुळे शेवगाव नगरपरिषद अग्निशामक गाडी कधी घेणार ? यावर आता चर्चा चालू आहे.

# मानव जातीला जिवन जगण्याची दिशा देण्याचे कार्य गौतम बुध्द यांनी केले – प्रताप ढाकणे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** मानव जातीला जिवन जगण्याची दिशा दाखवण्याचे कार्य तथागत गौतम बुद्ध यांनी केलआहे तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातुन कायद्याच्या चौकोटीतुन सर्व सामान्यासाठी दालन खुले करून दिले कायदा सुव्यवस्था प्रशासन याच संविधान नुसार चालते असे मत केदारेश्वर कारखाण्याचे चेअरमन अँड.प्रताप ढाकणे यांनी व्यक्त केले ते खरवंडी कासार येथे संयुक्त जयंती महोत्सव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेवा संघ प्रणित नालंदा सामाजिक सेवा संस्था खरवंडी कासार तालुका पाथर्डी आयोजित कार्यक्रम प्रसंगी बोलत होते तथागत गौतम बुध्द छत्रपती शिवाजी महाराज महात्मा जोतीबा फुले छत्रपती शाहु महाराज महा मानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संत भगवानबाबा आण्णा भाऊ साठे या महामानव यांची संयुक्त जयंती महोत्सव आयोजन करण्यात आले होते ध्वजारोहन खरवंडी कासार सरपंच



प्रदीप पाटील उपसरपंच रावसाहेब पवळे तर दिप प्रज्वलन केदारेश्वर कारखाण्याचे चेअरमन प्रतापराव ढाकणे माजी पंचायत समिती सदस्य किरण खेडकर यांच्यां हस्ते संपन्न झाले यावेळी अध्यक्ष विनायक नामदेव सोनावने सेक्रेटरी कानिफनाथ पावलस सोनावने खजीनदार महिंद्र मधुकर झेंडे पत्रकार बाळु शर्मा रविंद्र झेंडे प्रभाकर सोनवने आनंदा सोनवने अशोक शिंदे दशरथ शिंदे अशोक झेंडे अशोक सोनावने बाबासाहेब दयानंद सोनावने विनोद सोनावने साहेबराव सोनावने मार्कस घरवाढवे गोरक्ष सोनावने सुशांत उनावने रावसाहे व नामदेव सोनावने मिलिंद सोनावने दादा नामदेव सोनवने रोहीत सोनावनेपेत्रज गायकवाड आदी खरवंडी कासार सह परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# प्रसिद्धीचा काळ सरल्यावर दुर्लक्षित झालेल्या अभिनय क्षेत्रातील जेष्ठ कलाकारांना दैनंदिन आयुष्यात भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्टने सुरु केलेले काम अतिशय कौतुकास्पद - रविंद्र चव्हाण




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अभिनय क्षेत्रातील दिग्गज कलाकारांना आपण सिनेमाच्या रुपेरी पडद्यावर पाहतो. या क्षेत्रात मिळणारा पैसा व माया यांची चर्चा आपण ऐकतो. पण प्रसिद्धीच्या पडद्याबाहेर गेल्यावर त्या कलाकारांच्या आयुष्यामध्ये किती दुःख असते ते आपल्याला कधीही दिसत नाही. अशा या जेष्ठ कलाकारांसाठी दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख यांसारख्या कलाकारांनी एकत्र येऊन जेष्ठ कलाकारांचे दुःख, त्यांच्या गरजा, त्यांचे आजारपण यांसारख्या समस्या सोडवण्यासाठी सारखा एक मंच तयार केला असून या संस्थेतर्फे केले जाणारे काम अतिशय कौतुकास्पद आहे, असे वक्तव्य भाजपचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज मुंबईत केले.

सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्ट ()आणि सिने अँड टीव्ही आर्टिस्ट असोसिएशनच्या वतीने च्या स्थापनेत आणि - टॉवरच्या उभारणीत ज्या विश्वस्थ कलाकारांनी आपले अमूल्य योगदान दिले, त्यामध्ये प्रामुख्याने सुप्रसिद्ध अभिनेते दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख, अमरीश पुरी, अमजद खान, चंद्रशेखर वैद्य, दारासिंह या कलाकारांचा सन्मान करण्यासाठी त्या कलाकारांचे फोटो आणि माहिती देणाऱ्या फलकाचे उदघाटन आज भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळेस ते बोलत होते.

रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, अभिनय क्षेत्रातील प्रत्येक कलाकाराचा एक प्रसिद्धीचा काळ असतो. तो चांगला काळ ओसरला कि सरत्या काळात त्या कलाकारांकडे कुणी पाहत नाही. त्यांची कुणी चौकशी करत नाहीत. असे जवळपास ९ ते १० हजार कलाकार सध्या अभिनय क्षेत्रात आहेत. अशा कलाकारांचे दैनंदिन जीवन अतिशय हलाखीचे असते. यामध्ये अभिनय क्षेत्रात काम करणारे इतर कामगार यांची संख्या देखील मोठी आहे. याना सामाजिक जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, अशी माहिती मला च्या अध्यक्षा प्रीती सप्रू यांनी मला आज दिली. या सर्व समस्यांचे निराकरण करण्याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्याशी चर्चा करून लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करणार आहे. तसेच ला जेष्ठ कलाकारांकरिता मी कोकणातील केसरी, सावंतवाडी येथील माझी स्वतःची एक एकर जागा देण्यास तयार आहे, असे रविंद्र चव्हाण म्हणाले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी रविंद्र चव्हाण यांच्या सोबत जेष्ठ अभिनेत्री व च्या अध्यक्षा प्रीती सप्रू, ट्रस्टच्या सचिव अभिनेत्री संभावना सेठ, संस्थेचे खजिनदार अभिनेते दीपक पराशर, बॉलिवूड अभिनेते राजपाल यादव, मनोज जोशी, मुकेश ऋषी, आयुब खान, अभिनेत्री कुनिका आणि सिने व टीव्ही क्षेत्रातील अनेक कलाकार उपस्थित होते.

# राष्ट्रीय राष्ट्रसंत श्री गाडगेबाबा कथा साहित्य पुरस्काराने कथालेखक बाळासाहेब देशमुख सन्मानित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** २८ वे राष्ट्रसंत गाडगे महाराज साहित्य संमेलन शिर्डी येथे नुकतेच संपन्न झाले. संमेलनाध्यक्षपदी साहित्यिक राजेंद्र फंड हे होते. त्यांच्या समवेत आयोजक जेष्ठ कवी विलास पाटील कोल्हापूर, प्रमुख पाहुण्या सुमन देसाई मुंबई, पारितोषिक वितरण पाहुणे माया नवथर संभाजीनगर हे मान्यवर होते.

सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना.. राष्ट्रीय राष्ट्रसंत श्री गाडगेबाबा कथा साहित्य पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले. त्याप्रसंगी बोलताना संमेलन अध्यक्ष साहित्यिक राजेंद्र फंड म्हणाले आपल्या कथा निर्मितीतून संस्कृती, परंपरा आणि मानवी मूल्यांचे जतन होत असून ,समाजाला नवी



दिशा देण्याचे कार्य ,आपण सातत्याने करत आहात. ही अत्यंत अभिमानाची व प्रेरणादायी बाब आहे.

पारितोषिक वितरण पाहुणे माया नवथर आपल्या भाषणात म्हणाल्या. आपल्या शब्दातून व्यक्त होणारी भावनांची खोली ,समाज मनाला स्पर्श करणारी विचारसरणी आणि साहित्यिक अभिव्यक्तीतील सर्जनशीलता, ही खरोखरच प्रेरणादायी आहे. आपल्या कथा निर्मितीतून, संस्कृती, संवेदना व मूल्यांची जपवणूक होत आहे. ही अभिमानाची गोष्ट आहे.बाळासाहेब देशमुख यांचे कथालेखन, कथाकथन कार्यक्रम सदोदित होत असतात. रंग माझा वेगळा, माणसे अशी अन् तशीही.., माणसं भिंगातून.. हे कथासंग्रह त्यांचे प्रसिद्ध झालेले आहेत. या साहित्य संमेलनास महाराष्ट्राच्या विविध भागातून, अनेक साहित्यिक मान्यवर , बहुसंख्येने आलेले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ वाडेकर यांनी केले. साहित्य संमेलनाचे आभार प्रदर्शन आयोजक विलास पाटील यांनी केले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### कामगारांना हक्क केवळ संघर्षाच्या आणि एकजुटीच्या जोरावरच मिळाले -कॉ. पवार



अहिल्यानगर - ''कामगारांनी आजवर जे काही मिळवले आहे, ते केवळ संघर्षाच्या आणि एकजुटीच्या जोरावरच मिळाले आहे. भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आपली संघटना अधिक मजबूत करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन अवतार मेहेरबाबा कामगार युनियनचे युनिट अध्यक्ष कॉ. सतीश पवार यांनी केले. अरणगाव येथे लाल बावटा जनरल कामगार युनियन संलग्न 'अवतार मेहेरबाबा ट्रस्ट कर्मचारी युनियन' ची कामगार दिनानिमित्त बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षीय भाषणात पवार बोलत होते. प्रारंभी कामगार युनियनच्या फलकाचे पूजन करण्यात आले. उपस्थित कामगारांनी ''कामगार एकजुटीचा विजय असो'' आणि ''लाल बावटा झिंदाबाद'' अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. पुढे पवार म्हणाले की, १८८६ च्या शिकागो आंदोलनापासून सुरू झालेला कामगारांचा लढा आजही संपलेला नाही. ८ तास काम आणि कामाचा मोबदला हा आमचा घटनात्मक हक्क आहे. हक्कांसाठी लढाः मेहेरबाबा ट्रस्टमध्ये कार्यरत असणाऱ्या प्रत्येक कामगाराच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या कायदेशीर हक्कांच्या संरक्षणासाठी युनियन सदैव कटिबद्ध राहील, असे त्यांनी सांगितले. तर कोणत्याही दबावाला बळी न पडता कामगारांनी संघटनेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे त्यांनी आवाहन केले. या सभेला युनियनचे मार्गदर्शक ॲड. कॉ. सुभाष लांडे (जिल्हा सचिव) आणि ॲड. कॉ. सुधीर टोकेकर (जिल्हा कार्याध्यक्ष) यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सभेच्या नियोजनात संजय कांबळे, सुनील दळवी, बबन भिंगारदिवे यांनी विशेष पुढाकार घेतला. याप्रसंगी गणेश गहिले, सुभाष शिंदे, प्रविण भिंगारदिवे, राजू मोरे, श्रीनिवास वंगार व इतर कर्मचारी हजर होते. सर्व उपस्थित कामगारांनी आपले हात उंचावून, कामगार हितासाठी आणि संघटनेच्या बळकटीसाठी सदैव संघटित राहण्याची शपथ घेतली. आगामी काळात कामगार प्रश्नांवर अधिक तीव्रतेने लढा देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

### काम बंद करण्याच्या वादातून धमकी; सुपरवायझरची एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार

अहिल्यानगर- कंपनीतील कंत्राटी काम बंद करण्याच्या वादातून एका सुपरवायझरला शिवीगाळ व मारहाणीची धमकी दिल्याची घटना समोर आली असून, याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे. स्वप्निल शंकर भरड (वय ३१, रा. चेतना कॉलनी, नवनागापूर) यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, ते एका एक्साइड कंपनीमध्ये गेल्या सहा महिन्यांपासून सुपरवायझर म्हणून कार्यरत आहेत. कंपनीमध्ये चिरंजीव दत्तात्रय गाढवे यांचे वेल्डिंगचे काम असल्याने त्यांचे वारंवार येणे-जाणे सुरू असते. दि. २४ एप्रिल रोजी दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास कंपनीच्या गेट क्रमांक दोनवर चिरंजीव गाढवे व अरुण शिवाजी शिंदे यांनी भरड यांना अडवून कंपनीतील सुरू असलेले काम बंद करण्यास सांगितले. ''हे काम मी दुसऱ्या ठेकेदारामार्फत करणार आहे,'' असे गाढवे यांनी सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे. त्यावेळी भरड यांनी ''मी व माझा मालक पाहून घेऊ,'' असे उत्तर देत तेथून निघून गेले. त्यानंतर दि. २८ एप्रिल रोजी दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास पुन्हा कंपनीच्या गेटसमोर त्यांची भेट झाली. यावेळी गाढवे व शिंदे यांनी भरड यांना ''काम बंद का केले नाही? फार माजला का?'' असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच ''तू काम बंद केले नाही तर तुझे हातपाय तोडून टाकू,'' अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यानंतर दोघे तेथून निघून गेले. या घटनेनंतर स्वप्निल भरड यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी चिरंजीव दत्तात्रय गाढवे (रा. गणेश चौक, बोल्हेगाव फाटा) व अरुण शिवाजी शिंदे (रा. श्रीराम कॉलनी, पिंपरी चिंचवड) यांच्याविरुद्ध अदखलपात्र गुन्हा नोंदविला आहे.

# भावी पिढीतील दृष्टीदोष दूर करण्यासाठी आनंदऋषीजी नेत्रालयाचा दिशादर्शक उपक्रम – मंगलाताई रुणवाल

### आनंदऋषीजी नेत्रालयात मोफत बाल नेत्रतपासणी व तिरळेपणा उपचार शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णांना नवजीवन देण्याबरोबरच दृष्टीदोषामुळे अंधारलेल्या जीवनात प्रकाश आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहे. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांसाठी येथील नेत्रालय मोठा आधार ठरत असून, आर्थिक अडचणीमुळे कोणाचाही उपचार थांबू नये या उद्देशाने सेवाभावातून रुग्णसेवा सुरू आहे. अनुभवी तज्ञ डॉक्टरांच्या योगदानामुळे हे हॉस्पिटल मानवसेवेचे प्रभावी केंद्र बनले आहे. भावी पिढीतील दृष्टीदोष दूर करण्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन मंगलाताई रुणवाल यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी नेत्रालय येथे संथाराव्रतधारी श्रीमती पानाबाई लक्ष्मीचंदजी रुणवाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अजय रुणवाल, सतीश रुणवाल व मंगल रुणवाल परिवार (विजापूर/पुणे) यांच्या वतीने आयोजित मोफत बाल नेत्रतपासणी व तिरळेपणा उपचार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी स्मितेश रुणवाल, सतीश रुणवाल, प्रेमभाऊ बोथरा, मनिषा बोथरा, संतोष बोथरा, संगीता बोथरा, सतीश बोथरा, प्रतिभा बोथरा, गौरव बोथरा, रोहन बोथरा, डॉ. अशोक महाडिक, बाल नेत्ररोग तज्ञ डॉ. निरंजन पेहेरे, नेत्रालय विभागाचे प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड, श्याम चोरडिया, माणकचंद कटारिया, रवींद्र भंडारी, प्रकाश छल्लाणी आदींसह जैन सोशल फेडरेशनचे सदस्य उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, मागील अनेक वर्षांपासून आनंदऋषीजी नेत्रालयात हजारो शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या आहेत. लहान मुलांमधील दृष्टीदोष निर्मूलनासाठी नेत्रालयाने पुढाकार घेतला असून, वाढत्या डोळ्यांच्या समस्या वेळेवर लक्षात येत नाहीत. त्यामुळे पालकांनी जागरूक राहण्याची गरज आहे. मनपा व जिल्हा परिषद शाळांमधील साडेतीन हजार विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली आहे. गरजू विद्यार्थ्यांना मोफत चष्मे देण्यात येत असून, निवडक मुलांवर उन्हाळी सुट्टीत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभही दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रेमभाऊ बोथरा म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये 'दवा'सोबत 'दुवा' मिळत असल्याने संपूर्ण देशभर हॉस्पिटलची ख्याती पसरली आहे. गोरगरिबांना उपचाराची संधी उपलब्ध करून देत असताना तज्ञ डॉक्टरांचेही मोलाचे योगदान मिळत आहे. दृष्टीदोष असलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर उपचार सुरू असून, सक्षम भावी पिढी घडविण्याचे कार्य सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आनंद छाजेड यांनी सांगितले की, लहान मुलांमध्ये वाढत्या नेत्र समस्यांच्या पार्श्वभूमीवर या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, हे शिबिर महिनाभर सुरू राहणार आहे. बाल नेत्ररोग तज्ञ डॉ. निरंजन पेहेरे हे तिरळेपणा व इतर नेत्र विकारांवरील उपचारासाठी उपलब्ध आहेत. ते जिल्ह्याचे सुपूत्र असून, हैदराबाद येथील एल. व्ही. प्रसाद आय इन्स्टिट्यूट, हैद्राबाद मध्ये गेल्या १६ वर्षांपासून कार्यरत होते व आता पूर्ण वेळ आनंदऋषिजी नेत्रालय येथे सेवा देत आहेत. आफ्रिका, युरोप आणि अमेरिका येथेही त्यांनी काम केले असून, तिरळेपणा उपचारात विशेष प्राविण्य मिळवले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे मोठ्या शहरांमधील रुग्णदेखील येथे उपचारासाठी येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. निरंजन पेहेरे यांनी सांगितले की, नेत्र विकार लहान वयात ओळखून योग्य उपचार केल्यास भविष्यातील गंभीर धोके टाळता येतात. लहान मुलांना त्यांच्या दृष्टीदोषाची जाणीव होत नसल्याने पालकांनी नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. तिरळेपणा ही एकप्रकारची अपंगत्वाची स्थिती असून, यामुळे आत्मविश्वास कमी होतो तसेच करिअर व वैयक्तिक आयुष्यात अडचणी निर्माण होतात. थ्री-डी व्हिजनवरही परिणाम होतो. मात्र योग्य वेळी उपचार केल्यास हे दोष पूर्णपणे दूर करता येतात. आनंदऋषी नेत्रालयात या सर्व उपचारांची सुविधा उपलब्ध असून, पालकांनी मुलांच्या दृष्टीदोषाकडे दुर्लक्ष करू नये, असे आवाहन त्यांनी केले.

या शिबिरात डॉ. कौस्तुभ घोडके, डॉ नचिकेत पारगावकर, डॉ कुशल शहा , डॉ किरण ढेरे, डॉ ऋषिकेश डेरे, डॉ सारडा यांनी देखील नेत्र तपासणी केली. शिबिरात तीनशे पेक्षा अधिक बालकांची नेत्र तपासणी करण्यात आली असून, तिरळेपणावर आवश्यक त्या शस्त्रक्रिया देखील करण्यात येणार आहेत.

## धनेश बोगावत आयोजित, ए.पी. कॉर्प प्रायोजित जज़्बात गझल मैफल ९ रोजी




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगरमधील ज्येष्ठ संगीतप्रेमी धनेश बोगावत यांच्या संकल्पनेतून जज़्बात या हिंदी-उर्दू गझलांच्या मैफलीचा कार्यक्रम शनिवार दि. ९ मे रोजी सावेडीतील माऊली सभागृह येथे संध्याकाळी ६.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या मैफलीला प्रथित यश बांधकाम व्यवसाय समूह ए.पी. कॉर्प मुख्य प्रायोजक आहेत.

नगर शहरात उत्तमोत्तम सांस्कृतिक आणि सांगीतिक कार्यक्रम आयोजित करण्यात धनेश बोगावत यांचा नेहमीच पुढाकार असतो. याआधीही त्यांनी मदन मोहन, मराठी भावसंगीत यासारखे दर्जेदार कार्यक्रम आयोजित केले आहेत. नगर शहरात हिंदी-उर्दू गझल व शायरी पसंत करणारे अनेक रसिक श्रोते आहेत. नगर शहरात गझलांची विशेष मैफल सादर व्हावी, अशी रसिकांची अनेक दिवसांपासून मागणी होती. हे लक्षात घेऊन धनेश बोगावत यांच्या संकल्पनेतून जज्बात या हिंदी-उर्दू गझलांच्या आगळ्यावेगळ्या मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. गझल म्हणजे भाव-भावनांचा संवाद. काही तुमच्या, काही आमच्या या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम असणार आहे.

या मैफलीत ग्वाल्हेर घराण्याचे ज्येष्ठ गायक पं. नारायणराव बोडस यांचे शिष्य वैभव पांडे (छ. संभाजीनगर) व बेगम अख्तर यांच्या परंपरेतील सुप्रसिध्द गझल व ठुमरी गायिका शुभा जोशी यांच्या शिष्या वर्षा जोशी (छ. संभाजीनगर) हे गझल गायन करणार असून, सीए ज्ञानेश कुलकर्णी हे निवेदन करणार आहे.

या मैफलीचे संगीत संयोजन प्रसिध्द तबलावादक व संगीत संयोजक अमेय ठाकूर देसाई (मुंबई) हे करणार आहेत. वाद्यवृंदामध्ये तबला-अमेय ठाकूर देसाई, सारंगी संगीत मिश्रा, बासरी-हिमांशू गिंडे, गिटार-प्रेषित जैन व की बोर्ड अक्षय काळे हे साथसंगत करणार आहेत या कार्यक्रमाविषयी अधिक माहिती देताना विलास बडवे यांनी सांगितले की, पूर्णतः पारंपरिक गझलाचा कार्यक्रम हा प्रथमतः होत असून, नगरमधील रसिकांनी मोठ्या प्रमाणात याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

### चोरीचे सोने सराफाकडून जप्त; मात्र सराफाला आरोपी करण्याची मागणी

## कोतवाली पोलिसांची तात्काळ कारवाई; २० तोळे सोने जप्त



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** बस प्रवासादरम्यान चोरी गेलेल्या तब्बल २० तोळे सोन्याच्या दागिन्यांचा गुन्हा उघडकीस आणत कोतवाली पोलिसांनी तात्काळ व प्रभावी कारवाई करत चोरीचा तपास पूर्ण केला. २० तोळे सुमारे २५ लाखाचे सोने जप्त करण्यात यश मिळवले. या कामगिरीबद्दल पोलिसांचे कौतुक होत असतानाच, चोरीचे सोने विकत घेणाऱ्या सराफावर देखील कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी नेवासा तालुक्यातील करजगाव येथील मिनाबाई ज्ञानदेव बडाख यांच्या वतीने अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांना देण्यात आले.

दिलेल्या निवेदनानुसार, मिनाबाई बडाख ७ एप्रिल २०२६ रोजी त्या पुणेपाथर्डी एसटी बसने अहिल्यानगरकडे प्रवास करत होत्या. रांजणगाव (जि. पुणे) येथे दोन अनोळखी महिला बसमध्ये चढल्या. त्यापैकी एक महिला त्यांच्या शेजारी येऊन बसली. काही वेळाने झोप लागल्यानंतर त्या महिलांनी संधी साधून बडाख यांच्या बॅगेतील सोन्याचे दागिने चोरून नेले.

अहिल्यानगर बसस्थानकावर उतरल्यावर हा प्रकार लक्षात येताच बडाख यांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी तत्परतेने तपास करत माया कल्याण भोसले (रा. हादगाव, ता. शेवगाव) हिला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान तिने गुन्ह्याची कबुली देत चोरीचे सोने बोधेगाव येथील सराफ व्यावसायिक भागवत मधुकर आदापुरे याला विकल्याचे सांगितले. यानंतर पोलिसांनी संबंधित सराफाकडून चोरीचे सर्व सोने एका तासात जप्त केले. त्यामुळे पीडित महिलेला दिलासा मिळाला आहे. मात्र, या प्रकरणात चोरीचे सोने खरेदी करणाऱ्या सराफावर अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

पोलीस अधिकाऱ्यांनी सदरचे चोरी गेलेले सोने हे सराफ दुकानदार भागवत मधुकर आदापुरे यांच्याकडून जप्त केलेले आहे. असे असतांनाही संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांनी केवळ माया कल्याण भोसले हिलाच सदर गुन्हयामध्ये आरोपी केलेले आहे. सदर भागवत मधुकर आदापुरे हा अदयापही मोकाट फिरत आहे. वास्तविक पहाता भागवत मधुकर आदापुरे यास देखील सदर गुन्हयाचा सखोल तपास होण्याकामी सदर गुन्हयामध्ये आरोपी करणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत गरजेचे व आवश्यक असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

## न्यू इंग्लिश स्कूल १९८८ बॅचचा स्नेह मेळावा उत्साहात

### कामगार दिनानिमित्त हॉटेल मधील कामगारांचा सन्मान; मित्रांच्या जुन्या आठवणींना उजाळा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** वाळकी (ता. नगर) येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या इयत्ता १० वी (एस.एस.सी.) १९८८ बॅचचा स्नेह मेळावा महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने शहरात उत्साहात पार पडला. तब्बल ३६ वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत जुन्या मैत्रीचा आनंद लुटला.



या विशेष प्रसंगी सामाजिक बांधिलकी जपत कामगार दिनानिमित्त हॉटेलमधील सर्व कामगारांचा सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात आले. हा उपक्रम कामगारांच्या मनाला भावला. कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग, उद्योजक रामराव मुनफन, सेवानिवृत्त मेजर रविंद्र नाईक, शिरीष गायकवाड, अरुण कुंजीर, रामदास इंगळे, दामोधर भालसिंग, वसंत कासार, राजेंद्र निमसे, हरिचंद्र माने, विनायक इंगळे, पोपट बाचकर, दादा पडवळकर, सुरेश जासुद, संगिता मते आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्नेह मेळाव्यात सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपल्या सध्याच्या जीवनप्रवासाबद्दल माहिती देत एकमेकांशी संवाद साधला. शालेय जीवनातील गमतीजमती, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि त्या काळातील अनुभव यांना उजाळा देत वातावरण भावनिक व आनंददायी झाले. मैत्री, सहकार्य आणि आपुलकी यांचा पुन्हा एकदा अनुभव घेत सहभागींच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले. कामगार दिनाच्या निमित्ताने हॉटेलमधील कर्मचाऱ्यांचा सन्मान करून त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली. समाजातील प्रत्येक घटकाचे योगदान महत्त्वाचे असून, कामगारांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

विजय भालसिंग म्हणाले की, स्नेह मेळावा केवळ जुन्या मित्रांना भेटण्याचा कार्यक्रम नाही, तर आपल्या जीवनप्रवासाचा आढावा घेण्याची एक सुंदर संधी आहे. १९८८ मध्ये आपण जेव्हा शाळा सोडून वेगवेगळ्या वाटा निवडल्या, तेव्हा प्रत्येकाच्या आयुष्याचा वेगळा प्रवास सुरू झाला. आज ३६ वर्षांनंतर पुन्हा एकत्र येताना आपण किती बदललो आहोत, किती अनुभव घेतले आहेत, हे पाहून अभिमान वाटतो.

आपल्या शाळेने आपल्याला केवळ शिक्षण दिले नाही, तर माणूस म्हणून घडवले. त्या काळात शिक्षकांनी दिलेल्या संस्कारांमुळेच आपण आज समाजात विविध क्षेत्रात यशस्वीपणे कार्य करत आहोत. आज कामगार दिनाच्या निमित्ताने आपण कामगार बांधवांचा सन्मान केला, समाजाच्या प्रगतीत कामगारांचे योगदान अमूल्य आहे. आपण कोणत्याही पदावर असलो, तरी कामगारांच्या कष्टांची जाणीव ठेवणे ही आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच यावेळी उद्योजक रामराव मुनफन, सेवानिवृत्त मेजर रविंद्र नाईक, शिरीष गायकवाड व रामदास इंगळे यांनी आपल्या भाषणात शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

## शिक्षणात गुणवत्ता हाच प्रगतीचा खरा पाया – आशुतोष काळे

### गुणवंत शाखा, शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचा गुणगौरव



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ''शिक्षणात गुणवत्ता हाच प्रगतीचा खरा पाया आहे. रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाने शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्तेच्या बाबतीत आपला वेगळा ठसा उमटवला असून हे यश प्राचार्य शाखाप्रमुख गुणवंत शिक्षक आणि रयत सेवकांच्या सांघिक प्रयत्नांचे फळ आहे म्हणून गुणवंतांचा सन्मान म्हणजे गुणवत्तेचा व उद्याच्या उज्ज्वल भविष्याचा सन्मान असल्याचे प्रतिपादन उत्तर विभागाचे विभागीय चेअरमन आमदार आशुतोष काळे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाच्यावतीने आयोजित 'समन्वय समिती सहविचार व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ' प्रसंगी ते अध्यक्षीय भाषणात बोलत होते. ते पुढे म्हणाले की, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.खासदार शरद पवार यांचे विचार काळाच्या पुढे असतात व त्यामुळेच संस्था डिजिटल झाली आहे. मा. चेअरमन चंद्रकांत दळवी, व्हाईस चेअरमन ॲड.भगीरथ काका आणि विभागीय मॅनेजिंग कौन्सिल यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर विभाग गेली पाच सहा वर्षे भौतिक सुविधा व गुणवत्तेत प्रथम स्थानी आहे आणि हीच परंपरा आपण यापुढेपण सातत्याने पुढे घेऊन जाणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बैठकीपूर्वी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ कर्मवीर भाऊराव पाटील व रयत माउली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेवर पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. पाहुण्यांचे स्वागत विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे आणि सहायक विभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी यांनी केले. प्रास्ताविकात नवनाथ बोडखे यांनी शैक्षणिक भौतिक व मूलभूत सुविधांची तपशीलवार मांडणी केली. ते म्हणाले की, गुणवता हा एकमेव आजच्या स्पर्धेचा मापदंड समोर ठेवून विभाग चेअरमन व विभागीय व्यवस्थापन कमिटीच्या मार्गदर्शनाखाली कामकाज करीत आहे. गुणवत्तेमुळेच विद्यार्थी संख्या वाढत आहे. शिक्षकांची पदे रिक्त असतानाही शैक्षणिक कामकाजाचा अतिरिक्त भार शाखाप्रमुख व शिक्षक शिक्षिका सहन करीत आहेत. विभागातील प्रत्येक वर्ग खोलीमध्ये इंटरॅक्टिव्ह पॅनल बोर्ड बसवण्यात आल्याची त्यांनी माहिती दिली.

## महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले यांच्या वतीने कामगारांचा व खेळाडूंचा सत्कार

### मराठी माणसांना रोजगार मिळवून दिला – बाबुशेठ टायरवाले

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले यांच्या वतीने कामगार आणि खेळाडूंचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात कामगारांच्या योगदानाचा गौरव करतानाच खेळाडूंनाही प्रोत्साहन देण्यात आले.

यावेळी बोलताना बाबुशेठ टायरवाले यांनी आपल्या संघर्षमय वाटचालीचा उल्लेख करत सांगितले की, ''अहिल्यानगरमध्ये येऊन मला पन्नास वर्षे झाली. या काळात समाजातील गोरगरिबांच्या न्यायासाठी सतत लढा दिला. कामगार संघटनेच्या माध्यमातून हजारो मराठी कामगारांना रोजगार मिळवून दिला. त्यांच्या हक्कासाठी वेळोवेळी आंदोलन केले, जेलमध्ये जाण्याची वेळ आली तरी मागे हटलो नाही.''

त्यांनी पुढे सांगितले की, शिवसेना पक्षप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारातून प्रेरणा घेत २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण केले. ''मी कधीही कोणाच्या दबावाला बळी पडलो नाही, पैशासाठी इमान गहाण ठेवले नाही. प्रामाणिकपणे काम केल्यामुळेच नागरिकांनी भरभरून प्रेम दिले,'' १९९५ साली मी खासदार झालो असतो मात्र पक्षाने त्यावेळी परवेज दमानिया यांना उमेदवारी दिली समाजामध्ये काम करीत असताना कोणाचीही दादागिरी व अन्याय सहन करू नकाअसे ते म्हणाले.

राजकारणातील बदलत्या प्रवृत्तीवर भाष्य करत त्यांनी सांगितले की, ''सध्याच्या राजकारणात पैसे वाटणे आणि दादागिरी करून निवडून येण्याची प्रवृत्ती वाढली आहे. त्यामुळे चांगले लोक मागे पडत आहेत. नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी पैसे न वाटता आठ वेळा निवडून येऊन आदर्श निर्माण केला आहे. असे काम सर्वांनी करायला हवे.'' आपला देश महान असून संस्कृती परंपरा व अनेक भाषा असल्या तरी आपण सर्वजण एकत्र राहतो शिवसेनेचे नेतेएकनाथ शिंदे यांनी यांनी मुख्यमंत्री असताना समाजाच्या हितासाठी काम केले हिंदुरुदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी शाबीर शेख सारख्या मुस्लिम व्यक्तीला मंत्री केले त्यांच्या एवढा प्रामाणिक मंत्री मी पाहिला नाही.

# क्रीडा,शिस्त आणि आरोग्य यांचा समतोल साधा - प्रा. संजय धोपावकर

## डॉ.एन.जे.फार्मा रिदम-२०२६ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगली मैफल



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. एन.जे. पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी येथे वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन 'फार्मा रिदम - २०२६' हा बहुप्रतिक्षित कार्यक्रम माऊली सभागृहात अत्यंत दिमाखात आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, आकर्षक सांस्कृतिक सादरीकरणे आणि गुणवंतांचा सन्मान यामुळे संपूर्ण कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे पेमराज सारडा कॉलेजचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संजय धोपावकर तसेच श्री. स्वामी समर्थ आयुर्वेद चिकित्सालयाचे वैद्य लक्ष्मीकांत कोर्टीकर उपस्थित होते. कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष श्री. रामभाऊ बुचकुल, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार श्री. दादासाहेब भोईटे, तंत्रसंचालक डॉ.रेखाराणी खुराणा उपस्थित होते.

शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून पारितोषिक वितरण करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण झाली.

प्राचार्य डॉ. श्याम पांगा यांनी बी.फार्म व एम.फार्म विभागाचा वार्षिक अहवाल सादर करताना महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच प्राचार्या डॉ.अनुराधा चव्हाण यांनी डी.फार्म विभागाचा सविस्तर अहवाल मांडला. दोन्ही अहवालांतून संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधनवृत्ती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचे दर्शन घडले.

प्रा.संजय धोपावकर यांनी सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक यश पुरेसे नसून शारीरिक तंदुरुस्ती तितकीच आवश्यक आहे. नियमित क्रीडा उपक्रमांमुळे शरीरातील हार्मोनल संतुलन राखले जाते, रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि व्यक्ती निरोगी जीवन जगू शकते. खेळामुळे मानसिक ताण कमी होतो, एकाग्रता वाढते आणि औषधांवरील अवलंबित्वही कमी होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच खेळालाही प्राधान्य देऊन संतुलित जीवनशैली अंगीकारावी, असे त्यांनी ठामपणे सांगितले. शिस्त, टीमवर्क आणि नेतृत्वगुण यांचा विकास क्रीडेमुळे कसा होतो यावर भर दिला. खेळामुळे संघभावना वाढते, पराभव स्वीकारण्याची ताकद निर्माण होते आणि यशासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळते, असे त्यांनी स्पष्ट केले. जीवनातील प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी क्रीडेमधून मिळणारे हे गुण अत्यंत उपयुक्त ठरतात, असे त्यांनी नमूद केले.

वैद्य लक्ष्मीकांत कोर्टीकर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या नव्या पद्धतींबाबत मार्गदर्शन करताना गट-अभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, एकत्रित अभ्यासामुळे विचारांची देवाणघेवाण होते, संकल्पना अधिक स्पष्ट होतात आणि ज्ञान अधिक सखोल बनते. तसेच आजच्या बदलत्या काळात आंतरशाखीय संशोधनाची गरज वाढत असून विविध क्षेत्रांमधील समन्वयातून नवनवीन संधी निर्माण होतात, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमास संस्थेअंतर्गत विविध शाळांच्या मुख्याध्यापिकाअंजली शिरसाठ, सौ.मीरा नराल, विजया नवले, अनिता सिद्धम उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख डॉ. वेणू कोला, डॉ. प्रसाद घुगरकर, डॉ. रोशनी सूर्यवंशी,डॉ. विजय तारडे, प्रा.स्वाती कडनोर यांनी मोलाचे योगदान दिले. तसेच सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख सहा. प्रा. पल्लवी कदम, सहा. प्रा. रुपाली माताडे यांनी उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रमाला यशस्वीतेची किनार दिली. दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, नाटिका आणि विविध कलागुणांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. रंगतदार सादरीकरणांमुळे संपूर्ण सभागृह उत्साहाने भाराहून गेले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रोशनी सूर्यवंशी व सहा. प्रा. श्रद्धा मुंदडा यांनी केले.

# खाकीचा गौरव..! पोलीस हवालदार राजू सुद्रिक यांचा पोलीस महासंचालक सन्मानचिन्हाने गौरव

## एसपी सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते सन्मान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** राज्यातील पोलीस दलात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी आणि अंमलदारांना दिला जाणारा प्रतिष्ठेचा पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह ( ) पुरस्कार अहिल्यानगर पोलीस दलातील पोलीस हवालदार श्री. राजू आप्पासाहेब सुद्रिक यांना जाहीर झाला आहे.त्यांच्या या यशाबद्दल जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक कार्यालयाकडून सन २०२५ या वर्षासाठीचे सन्मानचिन्ह नुकतेच घोषित करण्यात आले.यामध्ये राज्यभरातील ८०० पोलीस अधिकारी व अंमलदारांचा समावेश आहे.

श्री.राजू अप्पा साहेब सुद्रिक यांनी अहिल्यानगर पोलीस दलात कार्यरत असताना गेल्या सतत १५ वर्षांपासून अत्यंत उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. त्यांचा उल्लेखनीय सेवा अभिलेख,उत्तम प्रशासकीय कार्यक्षमता आणि कर्तव्याप्रती असलेली निष्ठा लक्षात घेऊन त्यांना या सन्मानाने गौरविण्यात आले आहे.पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पत्राद्वारे सुद्रिक यांचे कौतुक करताना म्हटले की, ''आपल्या या उत्तम कामगिरीबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन.भविष्यात आपण अशीच उल्लेखनीय कामगिरी पार पाडाल, अशी मला आशा आहे.''सध्या श्री. राजू आप्पा साहेब सुद्रिक हे एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, अहिल्यानगर येथे पोलीस हवालदार (ब.नं. ३४५) म्हणून कार्यरत आहेत.त्यांना हा बहुमान मिळाल्याबद्दल पोलीस दलातील सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अहमदनगर एज्युकेशन सोसायटी व जैन युवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांमध्ये अवयवदान प्रबोधन

## अवयवदानाचा संदेश घराघरांत पोहोचवण्याचा उपक्रम




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** शहरात जैन ओसवाल युवक संघाच्या वतीने आणि फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन यांच्या सहकार्याने अवयवदान प्रबोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले. अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात शिक्षकांमध्ये जनजागृती करून अवयवदानाचा संदेश घराघरांत पोहोचवण्याचे आवाहन करण्यात आले.

हा उपक्रम अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास जैन ओसवाल युवक संघाचे अध्यक्ष भूषण भंडारी, फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशनचे दीपक पापडेजा, डॉ. सतीश आहिरे, अएसो चे खजिनदार प्रकाश गांधी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी जॉयसचे मनीष बोरा, रोहित लुनिया, अमित शिंगवी, प्रीतम पोखरणा, आनंद कटारिया, संकेत गांधी, सचिन डागा, प्रोजेक्ट चेअरमन तेजस डागा यांच्यासह अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

प्रास्ताविकात भूषण भंडारी यांनी अवयवदानाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, आजच्या काळात अवयवदान ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून मानवतेची खरी सेवा आहे. एका व्यक्तीच्या अवयवदानामुळे अनेकांचे जीवन वाचू शकते. मात्र समाजातील चुकीच्या समजुती, रुढी व परंपरांमुळे अनेक नागरिक पुढे येत नाहीत. या गैरसमजुती दूर करण्यासाठी व्यापक जनजागृती आवश्यक असून, त्यासाठीच या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रोजेक्ट चेअरमन तेजस डागा यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शिक्षक हे समाजाचे शिल्पकार आहेत. विद्यार्थ्यांमार्फत आणि त्यांच्या कुटुंबांमार्फत अवयवदानाचा संदेश मोठ्या प्रमाणात पोहोचवता येऊ शकतो. त्यामुळे या चळवळीला गती देण्यासाठी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शहरात शिक्षकांमध्ये जागृती करून पुढील पिढीपर्यंत हा विचार पोहोचवण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यकृतदान करणाऱ्या निकिता गांधी यांनी आपल्या अनुभवातून उपस्थितांना भावनिक संदेश दिला. त्या म्हणाल्या, ''एखाद्याचे प्राण वाचवणे हे सर्वात मोठे पुण्य आहे. मृत्यूनंतर शरीर दफन किंवा दहन केले जाते, पण त्याच शरीरातील अवयवांनी अनेकांना नवे जीवन देता येते. अवयवांसाठी रुग्णांना अनेक वर्षे प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे प्रत्येकाने अवयवदानासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.'' त्यांनी अवयवदान चळवळ अधिक व्यापक करण्याची आवश्यकता व्यक्त करत सर्वांनी यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश गुगळे यांनी केले. संपूर्ण शिबिरात उपस्थित शिक्षकांना अवयवदानाविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

# प्रियदर्शनी पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या उज्वल यशाची परंपरा कायम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज च्या विद्यार्थ्यांनी इयत्ता बारावी सायन्स १००% निकालाची परंपरा कायम ठेवून स्वामी राहुल साळुंखे याने ८८.३३ % गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकावला.तसेच यथार्थ श्रीकांत गवळी ८८.१७%, अनुष्का सुनील सांगळे ८६.८३ %,मृण्मयी दत्तात्रेय गिरमे ८६.५० %आणि संकेत सुभाष जाधव ८५.५०% गुण मिळवून कॉलेजच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला.

संस्थेचे अध्यक्ष श्री बाळासाहेब खोमणे सर, कॉलेजच्या प्राचार्य श्रीमती अंजली बोधक मॅडम, उपप्राचार्य श्री अमोल घोरपडे सर व पर्यवेक्षक कु.अनिता थापा मॅडम आणि सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# फ्रेंड्स कॉर्पोरेट लीगमध्ये नगर सिनियर्स व नगर सुपर किंग्सची दमदार कामगिरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** शहरातील फ्रेंड्स कॉर्पोरेट लीग क्रिकेट स्पर्धेत शनिवारी दि. २ मे रोजी झालेल्या सामन्यांमध्ये चुरस, थरार आणि एकतर्फी विजय यांचा संगम पाहायला मिळाला. नगर सिनियर्स आणि नगर सुपर किंग्स या संघांनी प्रभावी कामगिरी करत आपला दबदबा सिद्ध केला.

पहिल्या सामन्यात शिवराज ॲडव्होकेट्स आणि नगर सिनियर्स यांच्यात रंगतदार लढत झाली. प्रथम फलंदाजी करताना शिवराज ॲडव्होकेट्स संघाने निर्धारित षटकांत ८ गडी गमावत १३२ धावा केल्या. संघाच्या फलंदाजांनी संयमी खेळ करत मध्यम धावसंख्या उभारली. नगर सिनियर्सच्या गोलंदाजांनी वेळोवेळी बळी घेत प्रतिस्पर्ध्यांना रोखून धरले.

१३३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नगर सिनियर्स संघाने सुरुवातीपासूनच सकारात्मक खेळ केला. काही महत्त्वाच्या विकेट्स गमावल्या तरी फलंदाजांनी धीर न सोडता धावगती टिकवून ठेवली. अखेरीस १९.४ षटकांत ७ गड्यांच्या मोबदल्यात १३३ धावा करत त्यांनी विजय मिळवला. अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या मतीन शेख याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

दुसऱ्या सामन्यात नगर सुपर किंग्स आणि ए बी ॲक्ट अहिल्यानगर यांच्यात सामना झाला. ए बी ॲक्ट अहिल्यानगर संघाला नगर सुपर किंग्सच्या भेदक गोलंदाजीसमोर फारशी मजल मारता आली नाही आणि संपूर्ण संघ अवघ्या ४३ धावांवर बाद झाला. शिस्तबद्ध गोलंदाजीमुळे प्रतिस्पर्ध्यांना मोठी धावसंख्या उभारता आली नाही.

लहानसे लक्ष्य समोर असताना नगर सुपर किंग्स संघाने आक्रमक फलंदाजी करत अवघ्या ३.४ षटकांत सामना जिंकला आणि उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला. या सामन्यात उल्लेखनीय खेळ करणाऱ्या अथर्व बारटक्के याला सामनावीर म्हणून सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेतील पुढील सामने अधिक रंगतदार होण्याची शक्यता असून, उपांत्य फेरीत कोणते संघ बाजी मारतात याकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे. आयोजकांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# संजय आसरा विठ्ठल कळमकर: साहित्यिक डॉ. संजय कळमकर मार्ग

## चिचोंडी पाटील ग्रामस्थांनी व्यक्त केली कृतज्ञता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर-** १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून चिचोंडी पाटील ग्रामस्थांनी गावातील मुख्य रस्त्यास डॉ . संजय कळमकर मार्ग असे नामकरण करून डॉ . कळमकर यांच्या साहित्यिक कर्तुत्वाचा आगळा वेगळा सन्मान केला.

यासंदर्भात माहिती देताना सरपंच शरद पवार यांनी सांगितले की , आपल्या अमोघ वाणीने व सकस लेखनाने डॉ . संजय कळमकर यांनी आमच्या गावाचे नाव राज्यात प्रसिद्ध केले . आमचा गाव आमचा अभिमान या योजनेखाली डॉ कळमकर यांचे नाव रस्त्याला देण्यासाठी सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी एकमुखाने ठराव केला . यानिमिताने आम्हाला डॉ . कळमकर यांच्या कार्याचा सन्मान करता आला. याचबरोबर आजचे औचित्य साधून ग्रामपंचायतने सुमारे सात लाख रुपये खर्च करून ऑरो वॉटर प्यूरीफायर सुरू केले . आता ग्रामस्थांना दहा रुपयांमध्ये २० लिटर शुद्ध पाणी मिळू शकेल.

सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ताभाऊ काकडे. प्रशासक सरपंच शरद पवार ,उपसरपंच यशोदाताई कोकाटे. ग्रामपंचायत सदस्य वैभव कोकाटे. माऊली ठोंबरे. दत्तू धुळे. संदीप काळे. प्रशांत कांबळे. महादजी कोकाटे. कल्पनाताई ठोंबरे. चेअरमन संदीप कोकाटे. महादेव खडके, सुरेश ठोंबरे, बबन कोकाटे, डॉ.मारुती ससे, राजेंद्र पवार,अरुण दवणे, संतोष पवार,अर्जुन वाडेकर, आबासाहेब कोकाटे, आप्पासाहेब पवार,एस एस कोकाटे , कल्याण पाटील जगताप, करंडे गुरुजी,बाबासाहेब पवार, एस जी कोकाटे, खंडेराव पवार, भोस गुरुजी, छबुराव कोकाटे, चंदुकाका पवार, सुरेश तनपुरे आदि उपस्थित होते.

# म्हस्के विद्यालयाची निकालात उज्वल परंपरा कायम

## एच.एस.सी. परीक्षेत ८८.४६ टक्के यश; विज्ञान शाखेचा ९७.४०% निकाल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-**जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव संचलित काकासाहेब म्हस्के माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नागापूर या विद्यालयाने फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (एच. एस.सी.) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. यंदा विद्यालयाचा एकूण निकाल ८८.४६ टक्के लागला आहे.

या परीक्षेसाठी एकूण १५६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, प्रथम श्रेणीत ९, द्वितीय श्रेणीत ९६ तर तृतीय श्रेणीत ३३ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. शाखानिहाय निकालात विज्ञान शाखेने सर्वाधिक यश मिळवत ९७.४० टक्के निकाल नोंदविला आहे. विज्ञान शाखेत ७७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी ७५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेचा निकाल ८८.०९ टक्के लागला असून ४२ पैकी ३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेचा निकाल ७०.२७ टक्के लागला असून ३७ पैकी २६ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे.

कला शाखेत गौरी भाऊसाहेब गुंजाळ (३५४ गुण, ५९.००%), शुभांगी विठ्ठल दिसागत (३२४ गुण, ५४.००%) व खुशबू शब्बीर शेख (२९९ गुण, ४९.८३%) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला.

वाणिज्य शाखेत दिशा प्रकाश कनगरे (४४४ गुण, ७४.००%), आलिशा रेहमान पठाण (४४१ गुण, ७३.५०%) व अनिकेत अनिल क्षिरसागर (४०८ गुण, ६८.००%) यांनी आघाडी घेतली. विज्ञान शाखेत गौरी बाळकृष्ण पाटोळे (३९३ गुण, ६५.५०%) प्रथम क्रमांकावर राहिली. प्रीती अशोक शिलेदार (३६२ गुण, ६०.३३%) हिने द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच प्रांजल अशोक भुजाडे (३६० गुण, ६०.००%), सुरज रोहिदास बडे (३५८ गुण, ६०.००%) व वैष्णवी अनिल ढाकणे (३५७ गुण, ६०.००%) यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

# पैठण : आनंदाच्या क्षणी काळाचा घाला; हळदी समारंभात शोककळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**पैठण-** पैठण तालुक्यातील लोहगाव येथील लग्नाच्या घरातील हळदीच्या आनंदात अचानक दुःखाची छाया पसरल्याची धक्कादायक घटना तालुक्यात घडली. वराच्या मावस भावाचा शेततळ्यात बुडून मृत्यू झाल्याने हळदी समारंभावर अक्षरशः विरजण पडले. मिळालेल्या माहितीनुसार, लग्नसोहळ्याच्या पार्श्वभूमीवर घरात हळदीचा कार्यक्रम सुरू असताना ही दुर्दैवी घटना घडली. परिसरातील शेततळ्यात पोहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. काही वेळाने ही बाब लक्षात येताच शोधमोहीम राबविण्यात आली. स्थानिकांच्या मदतीने त्याला बाहेर काढण्यात आले; मात्र तोपर्यंत उशीर झाला होता.

या घटनेमुळे लग्नघरात एकच शोककळा पसरली असून, आनंदाचे वातावरण क्षणात दुःखात बदलले. नातेवाईकांचा आक्रोश पाहून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

(पान १ वरून)

# महिला डॉक्टरची आत्महत्या

तो निघून गेला. त्यानंतर तो परत आला नाही आणि कोणाचेही फोन उचलले गेले नाहीत. २८ एप्रिल २०२६ रोजी गौरी व तिची आई अहिल्यानगर आणि मुंबई येथे गेली, परंतु दोन्ही ठिकाणी घराला कुलूप होते. त्यानंतर ०२ मे २०२६ रोजी गौरी घरात एकटी असताना सकाळी साडेसात ते साडेआठच्या दरम्यान तिने शिलिंगच्या हुकाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. आई शेतातून परत आल्यावर ही घटना उघडकीस आली. उपचारासाठी तिला पारनेर येथील रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.डॉ. गौरी या पदवीधर असल्याने त्यांच्या अकाली निधनामुळे गोरेगाव आणि परिसरात शोककळा पसरली असून, नागरिकांकडून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी होत आहे.

# बुद्धिबळ खेळाडूंमध्ये दूरदृष्टी, संयम आणि सहनशीलता- उपमहापौर धनंजय जाधव

खेळाडूंना १० ते १२ फूट उंचीची झाडे देऊन ती जगवण्याचे पालकांना आवाहन त्यांनी केले.

या स्पर्धेतून निवड झालेल्या खेळाडूंमधून अहिल्यानगर जिल्ह्याचा मुलांचा व मुलींचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निश्चित करण्यात येणार आहे. प्रत्येक वयोगटातील पहिल्या पाच मुला-मुलींना ''उपमहापौर धनंजय जाधव करंडक'' देऊन गौरविण्यात येणार आहे.अहिल्या नगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष श्री नरेंद्र फिरोदिया यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रकाश गुजराथी यांनी केले.